SBC³ CENTRE FOR SOCIAL AND BEHAVIOUR CHANGE COMMUNICATION

महिला व बाल विकास WOMEN & CHILD DEVELOPMENT

unicef for every child



# 'बालविवाह विरोधी लढा'- मुलांच्या सक्षमतेच्या दिशेने

## पालक सत्रासाठी मार्गदर्शक पुस्तिका

सक्षम SAKSHAM

# ऋणनिर्देश

२०१८ पासून, सेंटर फॉर सोशल अँड बिहेवियर चेंज कम्युनिकेशन (SBC³) ने युनिसेफच्या भागीदारीत महाराष्ट्र शासनाच्या महिला आणि बाल विकास विभाग आणि जिल्हा प्रशासनांसह महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांमध्ये बालविवाह निर्मुलनासाठी करण्यासाठी कार्य केले आहे.

"सक्षम" या कार्यक्रमाद्वारे छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, सोलापूर, नाशिक, धुळे आणि जळगाव या जिल्ह्यांमधील बालविवाहाच्या मुळ कारणांचा शोध घेऊन त्यांच्यावर काम करण्यात आले आहे.विविध विभागांच्या एकत्रित कार्यां द्वारे, जिल्हा टास्क फोर्स (डिस्ट्रिक्ट टास्क फ़ोर्स) आणि जिल्हा कृती आराखड्याच्या (डिस्ट्रिक्ट एक्शन प्लॅन) माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती, सामुदायिक  सहभाग आणि असुरक्षित कुटुंबातील किशोरवयीन मुलींना आवश्यक सेवा पोहोचविण्याचे प्रयत्न यशस्वीरित्या केले गेले आहेत. हे सर्व महिला आणि बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, तसेच १२ जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सातत्यपूर्ण आणि गतिशील नेतृत्वामुळे शक्य झाले आहे.

लिंगभेद, खोलवर रुजलेली पितृसत्ता आणि प्रतिकूल लिंगभेद – जे बालविवाहाचे प्रमुख कारण आहेत – यांचा सामना करण्यासाठी युनिसेफ आणि SBC³ यांनी या १२ जिल्ह्यांतील शिक्षण विभागासह सहकार्य केले आहे. २०२२ पासून चालू असलेल्या शालेय विद्यार्थ्यांसाठी (६ वी ते १० वीच्या मुला-मुलींसाठी) क्रियाकलाप-आधारित लिंग परिवर्तनकारी कार्यक्रम राबविण्यात आला आहे, ज्यामध्ये २,५५,१०२ मुला-मुलींचा समावेश झाला होता. याच बरोबर पालकांसाठी लिंगभाव  आणि पालकत्व यावर सत्र आयोजित करण्यात आले होते, पालकांसोबतच्या संवादात्मक सहभागामुळे परिवर्तनासाठी सक्षम आणि समर्थनात्मक वातावरण निर्माण करण्यात मदत होत आहे.

आम्ही सर विठ्ठलदास ठाकरसी ठक्करशी  महाविद्यालयाच्या मास कम्युनिकेशन आणि एक्स्टेंशन विभाग, एसएनडीटी विद्यापीठ आणि त्यांच्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानतो, ज्यांनी या क्रियाकलापांचा विकास आणि प्रारंभिक चाचणी केली. या मॉड्यूलसाठी त्यांच्या मौल्यवान योगदानाबद्दल आम्ही विशेष आभार व्यक्त करतो.

आम्ही पुढील दोन वर्षांत १२ जिल्ह्यांतील ३००० शाळांमध्ये हे मॉड्यूल अंमलात आणत असताना, आम्ही शाळा व्यवस्थापन, शाळा शिक्षक आणि  भागीदार स्वयंसेवी संस्थांचे आभार मानतो, जे जवळपास ४,२०,००० मुलांपर्यंत हा कार्यक्रम पोहोचविण्यासाठी आम्हाला  आणि या कार्याला सहकार्य करतील. हा सहकार्यात्मक प्रयत्न मुलींसाठी सुरक्षितता निर्माण करण्यात, त्यांच्या स्वायत्ततेची वाढ करण्यात, वृत्ती बदलण्यात आणि लिंगभेद भावना बदलण्यात मोठी मदत करेल, ज्यामुळे बालविवाह रोखण्यात योगदान मिळेल असा आम्हाला विश्वास आहे.

धन्यवाद!

SBC³ आणि युनिसेफ महाराष्ट्र

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. प्रस्तावना | ७ |
| २. लिंगभाव सत्र | १० |
| ३. पालकत्व सत्र (पताक्यांच्या खेळ) | १४ |
| ५. घोषणा | १८ |
| ६.स्वयंसेविकेसाठी सूचना | १९ |




# प्रस्तावना

बाल विवाह ही एक जागतिक समस्या आहे. भारत जगातील सर्वाधिक बाल विवाह होत असलेला देशांपैकी एक आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण- ५ (२०१९-२०२०) नुसार भारतात २५.४ % इतके बालविवाह होत असताना आपल्याला पाहायला मिळतात, तर महाराष्ट्रात २१.९ % बाल विवाह होत आहेत. महाराष्ट्रात कोविड-१९ या कालावधी नंतर बाल विवाहाचे अधिक परिणाम झाल्याचे दिसून आले आहे, त्याची विविध कारणे असल्याचे दिसून येते. बहुआयामी दारिद्य, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ति, स्थलांतरामुळे मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याने तिचे लवकर लग्न लावून देणे ह्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येत आहे. बालविवाहाला सामाजिक मान्यता मिळत आहे, त्यामुळे ज्या घरात रूढी परंपरा व स्त्री -पुरुष असमानता आहे अशा ठिकाणी आपल्याला बाल विवाह होत असल्याचे दिसत आहे. कोविड-१९ काळात आभासी (online) पद्धतीने मिळत असलेल्या शिक्षणामुळे , ग्रामीण तसेच खेड्यातील मुलींच्या शिक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत अनेक मुलींचे शिक्षण अर्धवट सोडून घरातील परिस्थितीमुळे घरची कामे, किंवा घराला आर्थिक पाठबळ देण्यासाठी कामावर जाणे, किंवा घरचे ओझे कमी करण्यासाठी तिचे कमी खर्चात, कमी हुंड्यात किंवा विना हुंड्यात लग्न करून देण्यात येत आहे. युनिसेफ आणि SBC[3] यांच्या मार्फत २०१८ मध्ये पार पडलेल्या संशोधनात असे निदर्शनास आले की, शिक्षण आणि बाल विवाहाचा घनिष्ट सहसंबद्ध आहे. मुली जर शाळेत असतील आणि त्या त्यांचे १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले त्यांचे १८ वर्षाच्या आत लग्न होण्याची कमी शक्यता आहे. त्यामुळे त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवणे गरजेचे आहे.

मार्गदर्शक पुस्तिकेमध्ये लिंगभाव व पालकत्व असे दोन सत्र आहेत, प्रथम लिंगभाव आणि नंतर पालकत्व असे दोन्ही सत्र एकाच दिवशी घेणे अपेक्षित असून मोड्यूल चे उद्धिष्ट साधण्यासाठी त्याचा प्रभाव अधिक होईल. सदरील सत्रांना एकूण लागणारा कालावधी १.३० ते २.०० तासाचा आहे. हे सत्रे इयत्ता ६ ते १० वीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांसोबत खासकरून ग्रामीण भागातील व शहरी भागातील अशा वस्त्यांमधील शाळां मध्ये घेण्यात येईल जिथे बाल विवाह होण्याचे प्रमाण जास्त आहे किंवा जेथे शाळा बाह्य मुलींची आकडेवारीजास्त आहे.

## लिंगभाव आणि पालकत्व सत्रांचे उद्दिष्टये खालील प्रमाणे आहेत.

### लिंगभाव सत्र

ह्या सत्राचे उद्दिष्टये खालील प्रमाणे आहेत.

१) लिंगभाव या संकल्पनेची समज विकसीत करणे.
२) लिंगभेदामुळे स्त्री पुरुष असमानता आणि स्त्रियांच्या विकासवर त्याचा परिणाम होते हे समजून घेणे.
३) लिंगभाव, मुलींचा विकास, आणि हे सामाजिक समस्या बदलण्यासाठी योग्य पालकत्वाची गरज यावर चर्चा करणे.

### पालकत्व सत्र

ह्या सत्राचे उद्दिष्टये खालील प्रमाणे आहेत.

१) बाल विवाहाचे मुला - मुलींवर होणारे परिणाम खेळाच्या माध्यमातून समजावणे.
२) मुला-मुलींच्या लग्नासाठी योग्य वय आणि बालविवाह या बद्दल जाणून घेणे.
३) योग्य पालकत्व कसे असावे हे समजण्याचा प्रयत्न करणे.
४) लहान वयात लग्न केल्याने मुलांवर होणारे परिणाम समजून घेणे.



## परिचय

स्वयंसेविकेने स्वतःची ओळख करून द्यावी आणि लहानपणापासूनच्या एका मजेशीर किस्स्याने संभाषण सुरू करावे. नंतर पालकांच्या लहानपणातील कोणतीही एकमनोरंजक घटना विचारून पालकांना चर्चा सुरु करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. जसे की, पालकांना त्यांचे शिक्षण, बाल मित्र आणि मैत्रिणी तसेच विवाह, मुले या विषयीचे निर्णय आदि. प्रश्न विचारावे. ही कृती पालकांना त्यांच्या स्वतःच्या लहानपणा बद्दल आणि त्यांच्या पालकांच्या निर्णयावरविचार करण्यास प्रवृत्त करेल. त्यामुळे सत्रांमध्ये त्यांचे मन मोकळे राहील आणि चर्चा करण्यास आणि काही प्रमाणात मानसिकता बदलण्यास ते तयार होतील.



सत्र १



# कृतीचे नाव- लिंगभाव

**कालावधी**
३० मिनिटे

**लागणारे साहित्य**
प्रश्नांची यादी, खडू, सत्र अहवाल


**कृतीचे ठिकाण**
वर्ग खोली/ जेथे सत्र घेतले जाईल ती जागा

## कृतीचा उद्दिष्ट्ये

१) लिंगभाव या संकल्पनेची समज विकसीत करणे.
२) लिंगभेदामुळे स्त्री पुरुष असमानता आणि स्त्रियांच्या विकासवर त्याचा परिणाम होते हे समजून घेणे.
३) लिंगभाव, मुलींचा विकास, आणि हे सामाजिक समस्या बदलण्यासाठी योग्य पालकत्वाची गरज यावर चर्चा करणे.



## स्वयंसेविकेस मार्गदर्शक सूचना



- स्वयंसेविकेने पालक सत्राला विद्यार्थ्यांचे आई आणि वडील यांना उपस्थित राहण्यासाठीच्या सूचना विद्यार्थ्यांमार्फत द्याव्यात.
- स्वयंसेविकेने प्रश्नांच्या यादी समवेतसत्र घेण्यासाठी सोबत ठेवावी.
- स्वयंसेविकेने एका खुल्या व सुरक्षित जागेची निवड करावी.
- स्वयंसेविकेने पालक सत्र सुरू होण्याअगोदर एक लांब रेष आखून ठेवावी.
- स्वयंसेविकेने सत्र पूर्ण झाल्यावर अभिप्राय फॉर्म भरून घ्यावा आणि त्यावर मुख्याध्यापक यांची सही व शिक्का घ्या व तोव SBC[३] कडे पाठवावा.



## प्रक्रिया

स्वयंसेविका पालकांना पुढील प्रमाणे सूचना देईल

- लिंगभाव, खेळ खेळण्यासाठी सर्व पालकांना आखलेल्या रेषेवर उभे राहण्यासाठी सांगावे.
- स्वयंसेविकेने प्रश्न वाचल्या नंतर सहभागीचे उत्तर होय असेल तर त्यांनी टाळी वाजवून एक पाऊल पुढे यायचे आहे आणि, उत्तर नाही असेल तर, आहे त्याच ठिकाणी उभे राहायचे आहे.
- स्वयंसेविकेने प्रत्येक प्रश्न स्पष्टपणे वाचावा आणि पालक त्यावर प्रतिक्रिया देत आहेत याची खात्री करावी.



## प्रश्नाची यादी

१ . मी सकाळी ब्रश करून अंघोळ केली आहे

२ . मी सकाळी नाश्ता करून, काही खाऊन पिऊन घर बाहेर निघाले, निघालो आहे

३. लहानपणी मला गुलाबजामुन, जिलेबी, बासुंदी यांसारख्या मिठाई नेहमी आधी दिल्या जायच्या.

४. मला लहानपणी आईला घर कामात / स्वयंपाकात मदत करावी नाही लागली, मला माझे शिक्षण घेता आले (माझ्या शिक्षणात कसलेच अडथळे आले नाही)

५. मी शाळेत व शाळेतून घरी गेल्यानंन्तर मैदानी खेळ खेळायचे/ खेळायचो

६. मला लिहिता वाचता येते

७. माझ्या लग्नात जास्त खर्च माझ्या परिवाराला करावा नाही लागला

८. माझ्या घरातल्या कामांची जबाबदारी माझ्यावर नसल्यामुळे मला रात्री इतरांपेक्षा लवकर झोपता येते.

९. मी माझ्या मुलांचा सांभाळ करतो/करते

१०. घरातील राशन पाण्याचा खर्च मी उचलते/ उचलतो

११. मी जोखमीची आणि जड कामे करते/ करतो

१२. मी घरातील कुटुंब प्रमुख आहे व घरातील मोठे/ महत्वाचे निर्णय मी घेते/ घेतो

१३. .आमचे घर/शेती माझ्या नावावर आहे, होणार आहे/ मी त्याचा वारस आहे.

१४. माझ्या कडे स्वःताचा स्मार्ट फोन आहे

१५. माझ्याकडे स्वतःचे बँक खाते आणि ATM card आहे व त्याचे व्यवहार मी स्वःताच करते/ करतो

१६. मला गाडी (बाईक, मोटरसायकल, चारचाकी) चालवता येते

१७. मला राजकारणाविषयी विषयी माहिती व आवड आहे

१८. मला दुःख झाल्यावर मी रडून मन मोकळे करते/ करतो

१९. पालक म्हणून तुम्हाला मुला व मुलीमधील भेदभाव कमी करावासा वाटतो का?

२०. मला सकाळी सगळ्यांपेक्षा लवकर उठावे लागते, कारण घरातली सर्व कामे मला करावी लागतात

### अतिरिक्त प्रश्न- वेळ व उपलब्धी असल्यास वापरण्यात येतील असे प्रश्न

१. माझे आडनाव लग्नानंतर हि लग्नाआधीचेच आहे

२. मला माझ्या आवडीचे कपडे घालण्याचे स्वातंत्र आहे

३. मी माझ्या मर्जीने कोणत्याही वेळेस घराबाहेर जाते/ जातो

४. मला माझी पूर्ण कमाई घरात/ जोडीदारास द्यावी लागते

५. मी आठवी पेक्षा जास्त शिकले/ शिकलो आहे

६. लग्न झालं नसत तर मी अजून पुढे शिकलो/ शिकले असते

७. आमच्या कुटुंबात माझ्या शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले

- स्वयंसेविकेने सर्व प्रश्न संपल्यावर सहभागी पालकांना विचारावे की, "पुढे असणाऱ्यांमध्ये महिलांची संख्या जास्त आहे की पुरुषांची?" (रांगेत पुढे आलेल्या पालकांमध्ये पुरुष जास्त असतील असे गृहीत आहे.)
- या प्रक्रियेनंतर स्वयंसेविका पुढील रांगेतून एका पुरुष पालकाला निवडतील आणि विचारतील, "दादा, तुम्हाला जे शिक्षण मिळाले, ज्ञान मिळाले आणि तुम्ही पुढे आलात याचा तुम्हाला तुमच्या जीवनात काही फायदा झाला का?"
- त्यानंतर स्वयंसेविका मध्य रांगेतील महिला पालकास विचारतील, "ताई तुम्हाला जे शिक्षण, ज्ञान मिळाले ज्यामुळे तुम्ही इथपर्यंत पोहचलात परंतु जर तुम्हाला पूर्ण शिक्षण मिळाले असते आणि तुम्ही आणखी पुढे गेले असते तर याचा तुम्हाला फायदा झाला असता का?"
- आता शेवटच्या रांगेतील महिला पालकास स्वयंसेविका विचारतील, "ताई तुम्ही पाहिले कि आपल्या समाजात महिलापेक्षा पुरुषाला जास्त शिक्षण मिळते हे तुम्हाला योग्य वाटते का?"
- स्वयंसेविका सदरील प्रश्न पालकांना विचारेल तेव्हा प्रतिउत्तर देऊ नये केवळ पालकांचे उत्तर ऐकून घ्यावेत. या सत्राचा समारोप करताना स्वयंसेविका म्हणतील आपण यामध्ये सहभागी झालात याबद्दल सर्वांचे खूप खूप आभार. आता आपण वर्ग खोलीत जाऊन एक छोटीशी कृती करणार आहोत.

## सत्र २

प्रथम सत्र पूर्ण झाल्यास लगेच दुसऱ्या सत्रास सुरुवात करावी

# कृतीचे नाव - पताक्यांचा खेळ



**कालावधी**

२५ मिनिटे

**कृतीचे ठिकाण**

वर्ग खोली

**लागणारे साहित्य**

९ हिरवे कार्ड, ७ लाल कार्ड, २ पांढरे कार्ड [size 15×15 CM] (दोन्ही रंगाच्या कार्ड्सला कोपऱ्यात होल केलेले असावे), १ मोठी लाल रिबन/ दोरा, १ मोठी हिरवी रिबन/ दोरा, १ वाटी /प्लेट (कार्ड्स ठेवायला )

**पालकत्व ह्या सत्राचे उद्दिष्टये पुढील प्रमाणे आहेत**

१. पालकांना मुलांचे लवकर लग्न होणे चुकीचे आहे की बरोबर ह्या बद्दल त्यांचे मत जाणून घेणे.
२. बाल विवाहाचे मुला - मुलींवर होणारे परिणाम खेळाच्या माध्यमातून समजावणे.
३. मुला - मुलींच्या लग्नासाठी योग्य वय आणि बालविवाह या बद्दल जाणून घेणे.
४. योग्य पालकत्व कसे असावे हे समजण्याचा प्रयत्न करणे.
५. लहान वयात लग्न केल्याने मुलांवर होणारे परिणाम समजून घेणे.



## स्वयंसेविकेस मार्गदर्शन

पालक वर्गात येण्यापूर्वी, स्वयंसेविकेस लाल, हिरवी आणि पांढरी कार्डे तयार ठेवतील.

प्रथम सत्र पार पडल्यावर स्वयंसेविका पालकांना दुसऱ्या सत्रा बद्दल माहिती देतील व दुसऱ्या सत्राची सुरुवात हिरवे, लाल अश्या १६ कार्ड्स आणि २ पांढर्या कार्ड्सच्या सहाय्याने सुरु करतील.

### शब्दांचा संच: ९ हिरवे कार्ड्स






१. दोघांचे शिक्षण पूर्ण.
२. घरातील समान कामे.
३. मुलांशी त्यांच्या दिवसाबद्दल चर्चा.
४. मुलांना निर्णय घेण्याची संधी.
५. नोकरीच्या समान संधी.
६. २३-२५ वयात मूलाचा जन्म होण्यासाठी मार्गदर्शन.
७. मुलांसोबत त्यांच्या समस्यांबद्दल मोकळेपणा ने चर्चा.
८. त्यांच्या आवडी -निवडी आणि छंदांना प्रोत्साहन.
९. मुलींना मूलभूत स्वसंरक्षण कौशल्ये शिकवणे व मुलांना मुलींचा सन्मान करण्यास शिकविणे.

### शब्दांचा संच – ७ लाल कार्ड




१. आर्थिक सहाय्यासाठी मुलींचे १८ वर्षाआधी व मुलांचे २१वर्षाआधी लग्न.
२. मुलगी दुसऱ्या घरी लग्न करून जाणार म्हणून त्यांच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन न देणे.
३. मुलींनी फक्त घरातील कामे सांभाळायला शिकले पाहिजे
४. मुलांच्या आयुष्याचे निर्णय फक्त पालकच घेतील
५. मुलीचे लग्न १८ वर्षाच्या आत झाल्यास लवकर मुलाला जन्म देण्यासाठी तिला प्रवृत्त करणे.
६. बाल विवाह हि सामाजिक प्रथा योग्य आहे.
७. १० वर्षांनतर मुलींनी बाहेर खेळू नये.





## खालील प्रमाणे कृती असेल

### कृतीचा परिचय

स्वयंसेविका सत्राची सुरुवात पुढील प्रमाणे करतील. जेव्हा तुम्ही लहान होते तेव्हा तुमचे काही स्वप्न होते का? किंवा तुम्ही मोठे होऊन काय बनणार हे ठरवले होते का? ते स्वप्न काय होते याबद्दल थोडक्यात सांगा? हा प्रश्न स्वयंसेविका ५ ते ७ पालकांना विचारेल.

जेव्हा तुम्ही लहान होतात तेव्हा तुम्ही सर्व मित्र एकमेकांमध्ये तुमच्या पालकांबद्दल चर्चा करायचे का? जसे कि जेव्हा तुमचा चेंडू हरवला किवा नविन चेंडू पाहिजे तर कोणाच्या पालकांकडे जावे. कोण चांगले पालक आहेत कोण रागीट पालक आहे?

आता एक छोटी कृती करूया आणि बघूया कि चांगले पालक कसे असतात..!



## प्रक्रिया

स्वयंसेविका  एका वाटीत  हिरवे, लाल दोन्ही संचाचे कार्ड्स आणि पांढरे कार्ड्स एकत्रितपणे ठेवतील. त्यानंतर ते वाटी पालकांमध्ये फिरविले जाईल. स्वयंसेविका पालकांना एक एक कार्ड उचलण्यास सांगेल.

ज्या पालकांना हिरवे कार्ड आले असतील त्यांना स्वयंसेविकेच्या डाव्या बाजूला उभे राहण्यास सांगावे. तसेच ज्याना लाल कार्ड आले आहे त्यांनी स्वयंसेविकेच्या उजव्या बाजूला उभे राहण्यास सांगावे.

हिरवे व लाल कार्डचे दोरीच्या साह्याने वेगवेगळे तोरण तयार करून घ्यावे. उर्वरित पालकांना उभे राहून दोन्ही तोरण पाहण्यासाठी सांगावे. तसेच ज्याना वाचता येत नसेल त्यांनी ज्या पालकांकडे कार्ड आहे त्यांना विचारावे.



सर्व कार्ड वाचून झाल्यावर जे कार्ड आवडले असेल तिथे त्यांना थांबण्यासाठी सूचना द्यावी.

शेवटी स्वयंसेविका म्हणेल,-

आजच्या या खेळात आपण पाहिले की,  अधिकतर पुरुषांना जास्त शिक्षण, ज्ञान मिळते, व स्त्रियांपेक्षा जास्त संधी उपलब्ध असतात . आपण हे देखील समजून घेतले की चांगले पालक कोण असतात.

मी आशा करते की, आपण याबद्दल जरूर विचार कराल..!

चला तर, आपण एक 'घोषणा' म्हणूया..(ही घोषणा पुढील पानावर दिली आहे)

घोषणा झाल्यावर स्वयंसेविका सर्व पालकांना धन्यवाद करेल आणि सत्राची समाप्ती झाली असे कळवे.



# घोषणा

सर्व पालक गोल उभे राहतील व स्वयंसेविकासोबत टाळ्या वाजवून पुढील घोषवाक्य म्हणतील:-

**मुलगा असो वां मुलगी असो,**

**भेदभावा ची साथ नसो,**

**मुलांमध्ये आत्मविश्वास जागवू,**

**त्यांच्या आयुष्याचे निर्णय त्यांच्या सोबतच मिळून घेऊ.**

(ही घोषणा पालक दोन वेळा म्हणतील)



# स्वयंसेविकेसाठी सूचना

१. कार्यक्रम कधी सुरू करावा ?

शाळेसोबत मिळून आयोजित केलेल्या वेळेत कार्यक्रम घ्यावा.

२. खोलीत प्रवेश कसा करावा ?

चेहऱ्यावर स्मितहास्य ठेवा आणि खोलीत शांतपणे प्रवेश करावा, जसे की आपण काय करत आहात हे समजले पाहिजे.

३. कृतीसाठी काही सामान नसेल तर काय करावे?

घाबरू नका, तुम्ही त्यासाठी काही तरी वापरू शकता

४. वर्गात बोर्ड नसल्यास काय करायचे?

तुम्ही स्लेटचा (पाटीचा) किंवा फरशीचे कोपरे देखील चिन्हांकित करू शकता किंवा तुम्ही लिहिण्यासाठी कागद वापरू शकता आणि पालक ते धरू शकतात.

५. पालकांशी संवाद कसा साधायचा?

सर्वप्रथम, सुरुवातीला परिचयाने सुरुवात करा, त्या नंतर त्यांना स्वतः ची ओळख करून देण्यास सांगा, तुम्ही स्वतःबद्दलही बोला जेणेकरून ते तुमच्याशी बोलण्यासाठी खुल्ले होतील, त्यांना खेळ/सत्र  समजावून सांगा, त्यांना क्रियाकलापाबाबत काही प्रश्न असल्यास त्यांना विचारा, प्रश्न असल्यास किंवा समजले नसल्यास, कृपया त्यांना पुन्हा समजावून सांगा, आणि क्रियाकलाप संपल्यानंतर, त्यांना विचारा की, त्यांना क्रियाकलाप कसा वाटला, त्यांनी त्याचा आनंद घेतला का? इ.

६. पालकांनी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण पूर्ण न करण्याचे कारण दिल्यास काय करावे?

मुलांसाठी मोफत शिक्षणासाठी  अनेक सरकारी योजना आहेत, तुम्ही त्यांचा नेहमी लाभ घेऊ शकता, (स्वयंसेविकेने  योजनांचा उल्लेख करावा व शिक्षकांना देखील बोलण्यासाठी प्रेरित करावे.

### ७. पालकांना प्रश्न असल्यास त्याची उत्तरे देता येत नसल्यास काय करावे?

त्यांचा प्रश्न नोंद करून, त्याचे उत्तर शोधून लवकरच त्यांच्या शिक्षकांना सांगण्यात येईल असे कळवावे, व त्याचा पाठपुरावा करून योग्य ते उत्तर जिल्हा समन्वयक यांच्या सोबत चर्चा करून द्यावे. कोणताही बाल विवाह होणार असल्याचे उघड केल्यास, शिक्षक व मुख्याध्यापक यांच्याशी चर्चा करा व स्वयंसेवकांनी email आणि whatsapp संदेशाद्वारे सर्व तपशील जिल्ह्याच्या SBC[3] प्रकल्प समन्वयकाला कळवावे.